मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी हालचालींना वेग

## भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटेंचा महापौर पदावर दावा! 2012 पासून काटे इच्छुक...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदासाठीची राजकीय हालचाल पुन्हा एकदा वेग घेत आहे. नुकत्याच पार पडलेल्या आरक्षण सोडतीत महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाल्याने, आतापर्यंत संधीपासून दूर राहिलेले अनेक नगरसेवक सक्रिय झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचे शहराध्यक्ष आणि नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी महापौर पदासाठी इच्छुक असल्याचं म्हणत पक्षश्रेष्ठी नक्कीच विचार करेल अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.



२०१२ पासून महापौरपदाच्या प्रतीक्षेत असलेले भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आता उघडपणे दावा केल्याने पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात मोठी चुरस निर्माण झाली आहे. भाजप संघटनेत दीर्घकाळ कार्यरत असलेले शत्रुघ्न काटे हे पक्षातील निष्ठावंत चेहरा मानले जातात. २०१२ आणि २०१७ या दोन्ही महापालिका निवडणुकांमध्ये ते महापौर पदासाठी इच्छुक होते. विशेषतः २०१७ मध्ये त्यांच्या नावाची महापौरपदासाठी जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, पक्षातील अंतर्गत राजकारण आणि समीकरणांमुळे ऐनवेळी त्यांची संधी हुकली आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील नितीन काळजे यांची महापौरपदी निवड झाली.

२०१७ साली पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर भाजपची सत्ता आली होती. त्या ऐतिहासिक सत्तेचे पहिले महापौर होण्याचा मान नितीन काळजे यांना मिळाला. मात्र, या प्रक्रियेत शत्रुघ्न काटे यांना डावलले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यानंतर स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठीही त्यांच्या नावाचा विचार झाला; परंतु आजतागायत महापालिकेतील कोणतेही महत्त्वाचे पद त्यांच्या वाट्याला आलेले नाही.

> “मी स्वतः महापौर पदासाठी इच्छुक आहे. मात्र अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींचाच असेल आणि तो आम्हाला मान्य असेल. यापूर्वी पद न मिळाल्याने मी नाराज झालो नव्हतो. संघटनेचे काम प्रामाणिकपणे करत राहिलो असून, आता पुन्हा एकदा संधी मिळण्याची अपेक्षा आहे.”
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजप.

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघात जगताप कुटुंबाला उमेदवारी देण्याच्या मुद्द्यावर उघड विरोध केल्यानंतर शत्रुघ्न काटे यांना शहराध्यक्ष पद मिळाले होते. त्यांनी संघटनात्मक काम सुरू ठेवत पक्षाशी निष्ठा कायम राखली.

२०२६ च्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शत्रुघ्न काटे यांच्यावर पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप शहराध्यक्ष असताना जशी भाजपला शहरात सत्ता मिळाली होती, त्याच धर्तीवर काटे यांच्या काळातही भाजपची सत्ता टिकून राहिली. या यशात संबंधित आमदार आणि संघटनेचा मोठा वाटा असल्याचे बोलले जाते.

महापौर पदासाठी स्पर्धा तीव्र होण्याची चिन्हे असून, भोसरी विधानसभा मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले रवी लांडगे, माऊली जगताप, जालिंदर शिंदे, शीतल शिंदे यांच्यासह अनेक नगरसेवक इच्छुक असल्याची माहिती आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक रिंगणात 423 उमेदवारांचे ‘डिपॉझिट’ गुल...

## भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या एकाही उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक रिंगणात उतरलेल्या ६९२ विविध राजकीय पक्षासह अपक्ष उमेदवारांपैकी ४२३ जणांची अनामत (डिपॉझिट) रक्कम जप्त झाली आहे. २६९ उमेदवारांची अनामत रक्कम वाचली आहे.



महापालिका निवडणुकीच्या रिंगणात भाजपचे १२३, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे १२२, शिवसेना (शिंदे) पक्षाचे ५८, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे ४६, कॉंग्रेसचे ४७, वंचित आघाडीतर्फे ३६, आम आदमी पार्टीचे ३२, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे १३, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचे ११ आणि अपक्ष २०४ असे ६९२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी भाजपचे ८४, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे ३७, शिवसेना (शिंदे) पक्षाचे ६ आणि एक अपक्ष असे १२८ नगरसेवक निवडून आले आहेत. निवडणुकीत ५६४ जणांना अपयशाला सामोरे जावे लागले. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या एकाही उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली नाही.

महापालिका निवडणुकीच्या रिंगणात शिवसेना (शिंदे) पक्षाने ५८ उमेदवार उतरवले होते. त्यांपैकी १४ उमेदवारांची अनामत रक्कम वाचली आहे, तर ४४ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. दुसरीकडे काँग्रेससाठी ही निवडणूक अत्यंत निराशाजनक ठरली. काँग्रेसच्या ४७ उमेदवारांपैकी केवळ एका उमेदवाराची अनामत रक्कम वाचली. ४६ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पाच जणांची अनामत रक्कम वाचली असून सहा जणांची जप्त झाली आहे. वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी, बसप जाणि सनय छत्रपती शासन या पक्षांच्या सर्व उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. अपक्ष उमेदवारांपैकी केवळ सहा उमेदवारांची अनामत रक्कम वाचली असून १९८ अपक्षांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

### उमेदवाराचे अनामत जप्त होण्याचे गणित

» निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला ठरावीक रक्कम जमा करणे बंधनकारक असते. वेगवेगळ्या निवडणुकीसाठी वेगवेगळी रक्कम निर्धारित करण्यात आली आहे. आरक्षणांतर्गत असलेल्या उमेदवाराला ही रक्कम कमी असते. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, कोणत्याही उमेदवाराला त्याची अनामत वाचवण्यासाठी मतांचा ठराविक कोटा पार करावा लागतो. प्रभागात पडलेल्या एकूण वैद्य मतांच्या किमान १/६ (सहावा हिस्सा किंवा एक षष्ठांश) मते मिळवणे अनिवार्य असते. एकूण वैध मतांच्या १६.६७ टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली, तर उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होते.

# प्रशासकीय राजवट संपतेय, आर्थिक ओझ्यामुळे नव्या पदाधिकाऱ्यांची कसरत

## चार वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत मंजूर महागडी कामे सुरूच; नव्या नगरसेवकांवर देखरेखीची जबाबदारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेली नऊ वर्षे सुरू असलेली प्रशासकीय राजवट लवकरच उठत आहे. लोकशाहीसाठी हे सकारात्मक चित्र आहे. मात्र, चार वर्षातील प्रशासकीय राजवटीत मोठ्या खर्चिक कामांना मंजुरी देण्यात आली आहे. ती कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे नवनिर्वाचित नगरसेवक तसेच, पदाधिकाऱ्यांना चालू असलेल्या कामांवर देखरेख करण्याची वेळ येणार आहे. त्यात वर्षभराचा कालावधी जाण्याची शक्यता आहे.

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण, सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण आदींसह विविध कारणांमुळे महापालिकेची निवडणुकीत मुदतीमध्ये झाली नाही. त्यामुळे 12 मार्च 2022 ला महापालिका बरखास्त झाली. दुसऱ्या दिवसापासून 13 मार्चपासून महापालिकेत आयुक्त हेच प्रशासक म्हणून महापालिकेचा कारभार पाहू लागले. तब्बल 4 वर्षे प्रशासकीय राजवट होती. या काळात अनेक खर्चिक व मोठ्या खर्चाचे प्रकल्प, विकासकामांना मंजुरी देण्यात आली. प्रशासकीय राजवटीत सुरू करण्यात आलेली कामे सुरू आहेत.

महापालिका निवडणुकीचा 16 जानेवारीला निकाल लागला आहे. महापालिका प्रशासनाने महापौर निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली आहे. महापौर पद कोणत्या वर्गासाठी राखीव आहे, त्याची घोषणा गुरूवारी (दि.22) होणार आहे. त्यानंतर महापौर निवडीच्या प्रक्रियेस वेग येणार आहे. महापौराची निवड झाल्यापासून महापालिकेत प्रशासकीय राजवट जाऊन लोकप्रतिनिधींद्वारे कामकाज सुरू होणार आहे. त्यानंतर उपमहापौर, सत्तारूढ पक्षनेता, विरोधी पक्षनेता, स्थायी समिती सभापती तसेच, विविध विषय समितीच्या सभापतींची निवड केली जाणार आहे. तसेच, स्वीकृत नगरसेवकांची नियुक्त केली जाणार आहे.




### महापालिकेवर कर्ज घेण्याची वेळ

» कासारवाडी येथील नाशिक फाटा दुमजली उड्डाण पुलासाठी 160 कोटी रुपयांचे जागतिक बँकेकडून कर्ज घेतले असून, ते अद्याप फेडण्यात येत आहे. म्युन्सिपल बॉण्डमधून 200 कोटी कर्जाची रक्कम मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी वापरली जात आहे. ग्रीन बॉण्डमधून 200 कोटी रुपयांचे कर्ज हरित सेतू प्रकल्पासाठी खर्च करण्यात येत आहे. मोशी रुग्णालयासाठी 550 कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. संपूर्ण शहरात अधिक क्षमतेची नवीन ड्रेनेजलाईन टाकणे, जुन्या एसटीपीची क्षमता वाढविणे. मोशी कचरा डेपोत दुसरा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारणे, कासारवाडीत सांडपाण्याचा पुनर्वापर केंद्र उभारणे. रखडलेला पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण करणे. प्राधिकरण-निगडीनंतर शहरभरात हरित सेतू प्रकल्प राबवणे. पवना, मुळा व इंद्रायणी नदी सुधार या प्रकल्प या सर्व मोठ्या व खर्चिक प्रकल्पांसाठी तब्बल 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्याचा प्रस्ताव महापालिकेने केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडाकडे दिला आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीयकृत बँका तसेच, वित्तीय संस्थांकडून केंद्र सरकारच्या मदतीने कर्ज घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### पालखी महामार्गावरील कामे

» मुळा नदी सुधार प्रकल्पाच्या 274 कोटींच्या वाकड ते सांगवी पहिल्या टप्प्यातील काम
» सायन्स पार्कशेजारी 286 कोटींचा खर्चाचे 18 मजली महापालिका भवन इमारत
» पिंपरी येथे 127 कोटी खर्चाचे अग्निशमन मुख्यालय व प्रबोधिनी
» अनेक अद्ययावत अग्निशमन यंत्र वाहनांची खरेदी
» मोशी येथे 341 कोटी खर्चातून 700 बेड क्षमतेचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय
» थेरगाव येथे पीपीपी तत्त्वावर 100 बेडचे कर्करोग रुग्णालय
» शहरातील 18 मीटरपेक्षा अधिक रुंदीचे रस्ते यांत्रिक पद्धतीने साफसफाईवर 647 कोटींचा खर्च
» भामा-आसखेड पाणी योजनेतील जॅकेवल व पंपिंग स्टेशन बांधण्यासाठी 151 कोटींचे काम
» दापोडी ते निगडी मार्गावरील अर्बन स्ट्रीट डिजाईनचे 170 कोटींचे काम
» मामुर्डी-सांगवडे पुलाचे 37 कोटी खर्चाचे काम
» बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयातील तिसऱ्या टप्प्यातील25 कोटींचे काम
» पिंपरी डेअरी फार्म उड्डाण पुलाचे 66 कोटी खर्चाचे काम
» एकूण 809 कोटी खर्चाच्या शहरातील विविध 34 डीपी रस्त्याचे काम
» तळवडे येथील 75 कोटी खर्चाच्या बायोडायर्व्हसिटी पार्क
» मोशी कचरा डेपोत बायोमायनिंगचे 105 कोटीचे दुसऱ्या टप्पाचे काम
» महापालिका कामकाजासाठी 112 कोटी खर्चातून ई-ऑफिस नवीन संगणक प्रणाली
» निगडी, प्राधिकरणात 132 कोटी खर्चाचे हरित सेतूचे काम
» ड्रोनद्वारे सर्वेक्षणासाठी 76 कोटींचा खर्च करून नोंद नसलेल्या मालमत्तांचा शोध

# बसथांब्यावर सोनसाखळी चोरणारी आंतरराज्य टोळी एका तासात अटकेत

## यात सोनसाखळी चोरी, घरफोडी व दुचाकी चोरी असे तीन वेगवेगळे गुन्हे उघडकीस आणत पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

बसथांब्यांवर वयोवृद्ध महिलांना लक्ष्य करून गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अवघ्या एका तासात अटक केले. यात सोनसाखळी चोरी, घरफोडी व दुचाकी चोरी असे तीन वेगवेगळे गुन्हे उघडकीस आणत पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पीएमपीएमएल बसथांब्यांवर महिलांच्या गळ्यातील दागिने चोरी तसेच घरफोडीच्या घटना वाढत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासाच्या सूचना दिल्या होत्या. गुन्हे शाखा युनिट एकने दोन स्वतंत्र पथके तयार करून सीसीटीव्ही चित्रीकरण व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. दरम्यान, निगडी बसथांबा परिसरात वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करून पळणाऱ्या तीन महिलांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून दोन लाखांचे मंगळसूत्र व गंठण हस्तगत केले. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. ही आंतरराज्य टोळी असल्याचे उघड झाले आहे. कर्नाटक व महाराष्ट्रातील विविध ठिकाणी त्यांच्यावर चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, सहायक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट एकचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे, सहायक निरीक्षक दत्तात्रय गुळीग, उपनिरीक्षक कर्मराज गावडे, श्रेणी उपनिरिक्षक शिवानंद स्वामी, सहायक उपनिरिक्षक सूर्यकांत चेताळ, संतोष इंगळे, पोलिस अंमलदार जयवंत राऊत, देवा राऊत, अजय डगळे, सागर अवसरे, उषा दळे, विजय शेळकंदे, मारुती करचुंडे, महादेव जावळे, शिवराम भोपे, सोहल चिखलकर, लक्ष्मीकांत पतंगे, विजय जानराव, तेजस भालचिम, संदेश देशमुख, उध्दव खेडकर, दीपक तांदळे, केशव चेपटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.




### घरफोड्या केल्याची कबुली

» दिघी परिसरात घरफोडी करणाऱ्या एका संशयितासह चोरीचे सोने विकण्यास मदत करणाऱ्या महिलेलाही अटक करण्यात आली. त्यांनी दोन घरफोड्या केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून दीड लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत करून दिघी पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघड करण्यात आले. तिसऱ्या कारवाईत, दुचाकी चोरी करणाऱ्या विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेऊन त्याच्याकडील दीड लाख रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# पुण्याचे महापौर पदाचे आरक्षण जाहीर, कोणाची लागणार वर्णी ?

## सर्वसाधारण प्रवर्गाला आरक्षण जाहीर झाले असून आता नेमकी महापौर पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे लक्ष लागले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांची महापौर आरक्षण सोडत आज गुरुवारी (दि.२२) काढण्यात आली. पुण्यात कोणते आरक्षणाकडे इच्छुकांचे डोळे लागले होते. अनेक इच्छुक गॅसवर होते. आरक्षण जाहीर झाल्यामुळे महापौर पदाचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वसाधारण प्रवर्गाला आरक्षण जाहीर झाले असून आता नेमकी महापौर पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे लक्ष लागले आहे.

पुणे महापालिका निवडणुकीत भाजपची एकहाती सत्ता आली आहे. त्यामुळे खरंतर महापौर भाजपचाच होणार हे स्पष्ट होते. मात्र, महापौरपदाची आरक्षण सोडतीनंतर पुण्याचा महापौर नक्की कोण होणार याकडे लक्ष लागले होते. गेली अनेक वर्षे महापौरपदासाठी एससी महिला आणि ओबीसी पुरुषाचे आरक्षण निघालेले नाही. त्यात ओबीसी पुरुष आरक्षण निघण्याची शक्यता जास्त वर्तवली जात होती. मात्र सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत ११९ जागा मिळवून भाजपला निर्विवाद बहुमत मिळाले आहे. महापौरपदाचे आरक्षण सोडत गुरुवारी (दि.२२) रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील मंत्रालयाच्या इमारतीमधील सहाव्या मजल्यावर नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली महापौरपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. पुणे महापालिकेच्या २०१२ आणि २०१७ या निवडणुकांच्या वेळी महापौरपदाचे आरक्षण हे सर्वसाधारण गटाला होते. त्यामुळे अनेकांना महापौर होण्याची संधी होती.

पुणे महापालिका स्थापन झाल्यापासून कायमच भाजपला विरोधी बाकांवर बसावे लागले होते. सन २०१७ मध्ये प्रथमच भाजपने स्वबळावर निवडणूक लढवली आणि ९७ जागांसह एकहाती सत्ता मिळवली. या वेळी महापालिकेतील कारभाराचा अनुभव असलेल्या नगरसेवकांची संख्या मोजकीच होती. त्यामुळे पालिकेतील बहुसंख्य पदांवर काही ठराविक नेत्यांनाच संधी मिळाली होती. आता यंदाच्या निवडणुकीत भाजपला दोन तृतीयांश बहुमतासह जोरदार विजय मिळाला आहे. त्यामुळे ज्येष्ठ अनुभवी नगरसेवकांसह अनेकजण महापौर पदाच्या शर्यतीत आहेत. यामध्ये नक्की कोणाच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडणार याकडे लक्ष लागले आहे.




### महापौर निवडीचा कार्यक्रम

» यंदा राज्यात पहिल्यांदाच २९ महापालिकांच्या निवडणुका एकाच वेळी जाहीर होऊन पार पडल्या आहेत. यापूर्वी प्रत्येक महापालिकेच्या निवडणुका वेगवेगळ्या वर्षी होत असल्याने सभागृहांचा कार्यकाळही वेगळा असे. मात्र, सर्व महापालिकांची सभागृहे एकाच दिवशी अस्तित्वात आल्यास पुढील पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया प्रशासनाला अधिक सोपी होणार आहे. या पार्श्वभूमीवर महापौर निवडीचा कार्यक्रम राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडूनच दिला जाण्याची शक्यता असल्याचे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ५ फेब्रुवारीपूर्वीच नवा महापौर मिळण्याची शक्यता

» राजकीय गडबड निकाल जाहीर झाल्यानंतर काहीशी शांत झाली आहे. मात्र, आता शहराच्या नेतृत्वाकडे सर्वांचे लक्ष लागले असून महापौर आणि उपमहापौरपदासाठी कोणाची वर्णी लागणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी १० फेब्रुवारीपर्यंत नवे सभागृह अस्तित्वात येण्याची शक्यता व्यक्त केली होती. दरम्यान, गुरुवारी महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता पुढील पंधरा दिवसांतच महापौर निवडीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकते, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. त्यामुळे ५ फेब्रुवारीपूर्वीच पुण्याला नवा महापौर मिळण्याची दाट शक्यता आहे.

### महापौर आरक्षण सोडत

- » मुंबई, नवी मुंबई, पुणे, संभाजीनगर – खुला प्रवर्ग
- » अमरावती, भिवंडी, वसई विरार, मीरा भाईंदर – खुला प्रवर्ग
- » मालेगाव, परभणी, सोलापूर, नाशिक – खुला प्रवर्ग
- » नागपूर, नांदेड, धुळे – खुला प्रवर्ग
- » पिंपरी चिंचवड, सांगली खुला प्रवर्गासाठी राखीव

# ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’निमित्त वाहतुकीत बदल; पालिका हद्दीतील शाळांबाबत मोठा निर्णय

## पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व शासकीय व खासगी शाळा शुक्रवारी दुपारी बारा वाजेपर्यंत सुरू ठेवून त्यानंतर बंद ठेवण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा समारोप शुक्रवारी (दि. २३ जानेवारी) होणार असून, या अंतिम टप्प्यासाठी शहरातील मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक बदल करण्यात आले आहेत. स्पर्धेमुळे संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व शासकीय व खासगी शाळा शुक्रवारी दुपारी बारा वाजेपर्यंत सुरू ठेवून त्यानंतर बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

या स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात ९९ किलोमीटर अंतराची शर्यत होणार आहे. बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथून स्पर्धेला सुरुवात होणार असून, पाषाण मार्गे एनसीएल चौक, रक्षक चौक, काळेवाडी फाटा, डांगे चौक, संत तुकाराम महाराज पूल, भक्ती शक्ती चौक, त्रिवेणीनगर, तापकीर चौक, पुन्हा काळेवाडी फाटा, आचार्य आनंदऋषीजी चौक (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक), सेनापती बापट रस्ता, बालभारती, नळस्टॉप, लक्ष्मीनारायण चौक, शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौक (सेव्हन लव्हज चौक), लष्कर परिसरातील टर्फ क्लब, साधू वासवानी चौक आणि साखर संकुल असा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी चौक येथे स्पर्धेचा समारोप होणार असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

बालेवाडीतील राधा चौक ते सुस खिंड रोड, पूनम बेकरी ते पाषाण चौक, पाषाण ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राजीव गांधी पूल, सेनापती बापट रस्ता, पत्रकार भवन ते विधी महाविद्यालय रस्ता, नळस्टॉप ते सेनादत्त पेठ, टिळक चौक ते अप्पा बळवंत चौक, दगडूशेठ हलवाई चौक ते मंडई, छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील राष्ट्रभूषण चौक ते ना. सी. फडके चौक, नरपतगिरी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, लष्कर भागातील अर्जुन चौक ते घोरपडी परिसर, लाल महाल चौक ते स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे) तसेच गरवारे चौक ते जंगली महाराज रस्ता या मार्गांवर वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.



### रस्ते टप्प्याटप्प्याने बंद केले जाणार

» स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी दुपारी बारा ते चार या वेळेत करण्यात आले असून, रस्ते टप्प्याटप्प्याने बंद केले जाणार आहेत. कोणताही रस्ता अर्ध्या तासांपेक्षा जास्त वेळ बंद ठेवला जाणार नाही, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी स्पष्ट केले. स्पर्धेच्या मार्गावर दुतर्फा वाहन उभी करण्यास मनाई करण्यात आली असून, या काळात शहरात जड वाहनांना प्रवेश बंद राहणार आहे. रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांसाठी तत्काळ मार्ग मोकळा करून दिला जाणार असून, स्पर्धेचा ताफा पुढे गेल्यानंतर मागील रस्ते वाहतुकीस खुले करण्यात येणार आहेत. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# पुणे ग्रँड टूर सायकलिंग: मराठा हेरिटेज टप्प्यातही ल्यूकची बाजी

## दुसऱ्या टप्प्यातील 105.3 किमीचे अंतर 2 तास 31 मिनिटे 49 सेकंदात पार करत सलग दुसऱ्या दिवशी यलो जर्सीचा मान

**पुणे | प्रतिनिधी**

नारायणपूरच्या एकमुखी दत्त महाराज, पुढे जाऊन केतकावळे येथील बालाजीचा आशीर्वाद घेत, मग ऐतिहासिक सिंहगडावरील तानाजी मालुसरे यांच्या शौर्याची प्रेरणा घेत आव्हानात्मक अशा पुणे ग्रँड टूर सायकलिंगच्या 'मराठा हेरिटेज' या दुसऱ्या टप्प्यातही चीनच्या ली निंग स्टार संघाच्या ल्युक मडग्वे याने बाजी मारली.

तीव्र चढण आणि तितक्याच धोकादायक उतरणीच्या मार्गावर सहनशक्ती आणि धैर्याची कठीण परीक्षा देत ल्यूकने दुसऱ्या टप्प्यातील १०५.३ किमीचे अंतर २ तास ३१ मिनिटे ४९ सेकंदात पार करत सलग दुसऱ्या दिवशी यलो जर्सीचा मान मिळवला. दुसऱ्या टप्प्यातील विजयासह ल्यूकने आता पुणे ग्रँड टूर शर्यतीवर पकड मिळवली आहे. आज, गुरुवारी होणाऱ्या सासवड ते बारामती या १३४ किमी अंतराच्या टप्प्यातही ल्यूकने विजय मिळवल्यास अंतिम टप्प्याला सामोरे जाताना त्याची आघाडी भक्कम होईल.

कॅम्प परिसरातील लेडिज क्लबपासून दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली. नारायणपूर आणि केतकावळे या जिल्ह्यातील दोन श्रद्धास्थानांवरून पुढे जात कोंढणपूर मार्गे सिंहगडाच्या चढावरून मार्ग आखताना सायकलपटूंच्या शारीरिक क्षमतेची कसोटी लागली. तोपर्यंत साधारण ६० ते ६३ किमी वेग राखणाऱ्या सायकलपटूंचा चढावरच्या मार्गावर मात्र वेग कधी ४९, कधी ४३ किमी असा खाली येत होता. जेवढे तीव्र चढण होते, तेवढाच उतार तीव्र असल्यामुळे हा वेग पुन्हा वाढला. तेव्हा सायकलपटूंच्या वेगावरील नियंत्रणाची कसोटी लागली. ल्यूकने नेमक्या याच आघाडीवर आपली हुकुमत दाखवून थाटात सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटीसमोर अंतिम रेषा गाठली, तेव्हा उपस्थित पुणेकरांनी उत्स्फूर्त जल्लोष करत त्याचे स्वागत केले. भारतीय गटात भारतीय विकास संघाच्या मानव सारडा याने सरस वेळ देत ब्ल्यू जर्सी मिळवली.



### 'फोटो फिनिश'मध्ये निर्णय

» चढ-उताराचा दुसरा टप्पा जेवढा सायकलपटूंसाठी आव्हानात्मक ठरला, तेवढाच या टप्प्याचा निर्णय घेणे तांत्रिक अधिकाऱ्यांना आव्हानात्मक गेले. ल्यूकसह थायलंडच्या रूजाई इन्शुरन्स विनस्पीड संघाच्या ॲलन कार्टर बीटल्स, बेल्जियमच्या टार्टेलेटो-इसोरेक्स संघाच्या योर्बेन लॉरिसन, स्पेनच्या बर्गोस बुरपेलेट बीएच संघाचे क्लेमेंट एलोनो, जंबालजम्ट्स सेनबायर, गुआमच्या युरोसायकलिंग ट्रिप्स – सीसीएन संघाचा स्टीफन बेनेटोन या सहा स्पर्धकांनी २ तास ३१ मिनिटे ४९ सेकंद अशा समान वेळेत शर्यत पूर्ण केली. त्यामुळे तांत्रिक अधिकाऱ्यांनी 'फोटो फिनिश' तंत्राचा अवलंब करून दुसऱ्या टप्प्यातील पहिले सहा क्रमांक निश्चित केले. बीटल्स दुसऱ्या आणि लॉरिसन तिसऱ्या स्थानावर आले. पहिल्या तीन क्रमांकावरील सायकलपटूंना नियमाप्रमाणे अनुक्रमे १०, ६ आणि ४ सेकंदाचा बोनस देण्यात आला.

### बेनेटोन 'किंग ऑफ माउंटन'

» दुसऱ्या टप्प्यातील आव्हानात्मक डोंगरदऱ्याचा मार्ग सर्वांत सरस वेळेसह पार करण्याचा मान गुआमच्या युरोसायकलिंग ट्रिप्स-सीसीएन संघाच्या स्टीफन बेनेटोन याने मिळवला. या टप्प्यातील आव्हानात्मक येवलेवाडी (९७७ मीटर), कुसेगाव (८९५ मीटर) आणि कोंढणपूर (१००० मीटर) या मार्गावर अधिक कौशल्याने सायकलिंग करत बेनेटोन याने सर्वाधिक दहा गुणांची कमाई करताना 'किंग ऑफ माउंटन'चा मान मिळवला.

### सायकलपटूंच्या वेगावरील नियंत्रणाची कसोटी

» साधारण ६० ते ६३ किमी वेग राखणाऱ्या सायकलपटूंचा चढावरच्या मार्गावर मात्र वेग कधी ४९, कधी ४३ किमी असा खाली येत होता. जेवढे तीव्र चढण होते, तेवढाच उतार तीव्र असल्यामुळे हा वेग पुन्हा वाढला. तेव्हा सायकलपटूंच्या वेगावरील नियंत्रणाची कसोटी लागली. ल्यूकने नेमक्या याच आघाडीवर आपली हुकुमत दाखवून थाटात सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटीसमोर अंतिम रेषा गाठली, तेव्हा उपस्थित पुणेकरांनी उत्स्फूर्त जल्लोष करत त्याचे स्वागत केले. भारतीय गटात भारतीय विकास संघाच्या मानव सारडा याने सरस वेळ देत ब्ल्यू जर्सी मिळवली.

# पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत युती-आघाडीचा गोंधळ; शेवटच्या क्षणापर्यंत सस्पेन्स

## अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशीही चित्र अस्पष्ट; भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसमध्ये संभ्रम

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीप्रमाणेच पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत युती-आघाडीत गोंधळाचे चित्र पाहायला मिळाले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कोण कुणासोबत आणि कोण कुणाच्या विरोधात लढणार, हे स्पष्ट झाले नव्हते. त्यामुळे कार्यकर्त्यांसह इच्छुक उमेदवारही संभ्रमात होते. महापालिका निवडणुकीत दिसलेला युती व आघाडीचा एकत्र लढण्याचा तिढा या वेळीही कायम राहिला. याचा थेट परिणाम उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेवर झाला.

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी बुधवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस होता. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, काँग्रेस आणि शिवसेना या प्रमुख पक्षांमध्ये युती व आघाडीबाबत शेवटपर्यंत अनिश्चिततेचे वातावरण होते. महापालिका निवडणुकीप्रमाणेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही भाजपने शिवसेनेला शेवटपर्यंत झुलवत ठेवल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी केला आहे.

दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणुकीत दोन चिन्हांमुळे मतदारांचा गोंधळ उडाला होता. तो टाळण्यासाठी जास्तीत जास्त जागांवर 'घड्याळ' या चिन्हावर निवडणूक लढविण्यात येत असल्याचे दोन्ही पक्षांकडून सांगण्यात आले आहे. शिवसेनेचे नेते व आमदार विजय शिवतारे तसेच जिल्हाध्यक्ष रमेश कोंडे यांनी भाजपवर गंभीर आरोप केले. 'युतीसाठी भाजपकडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळाला नाही. जागावाटपाबाबत चर्चा करू, असे सांगण्यात आले. मात्र, शेवटपर्यंत कोणताही निर्णय कळविण्यात आला नाही. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व जागा शिवसेना स्वबळावर लढवणार आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.




### मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष विजय कोलते यांनी सांगितले की, बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या बहुतांश जागांवर दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे उमेदवार 'घड्याळ' या चिन्हावर एकत्र लढत आहेत. मात्र, खानापूर येथील पंचायत समितीची एक जागा तसेच मुळशी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चार जागांवर 'तुतारी' या चिन्हावर उमेदवार निवडणूक लढविणार आहेत. अंतिम चर्चा होण्यापूर्वीच एबी फॉर्म दिल्याने या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता आहे.